# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## मोबाईल मेडिकल युनिट

## नोटीस

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, जिल्हा परिषद जळगाव.

T-परमिट वाहन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय RTO दरानुसार पुरविण्याबाबत.

| अ.क्र | जाहीरातीचे विवरण | वित्तीय वर्ष २०२४-२५ करीता मोबाईल मेडीकल युनिट कार्यक्रमातंर्गत प्रति कि.मी. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) च्या दरानुसार मोठे टेम्पो ट्रॅव्हलर रुग्णवाहीका लावणेकरीता वाहनधारकाकडून T-Permit वाहन पुरविण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहे. |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ | दिनांक - 31/12/२०२४ ते 09/01/२०25 संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत |
| २ | अर्ज व कागदपत्र सादर करावयाचे ठिकाण | जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, नवीन ईमारत जिल्हा परिषद, जळगांव |

**अटी व शर्ती -**

१) उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) च्या दरानुसार मोठे टेम्पो ट्रॅव्हलर रुग्णवाहीका लावणेकरीता वाहनधारकाकडून T-Permit वाहन पुरविण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहे.

२) उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून प्राप्त प्रति कि.मी दराप्रमाणेच वाहनाचे देयक अदा करणेत येईल. वाहनाधारकाला इंधन व चालक पुरवायचे आहेत.

३) मोठे टेम्पो ट्रॅव्हलर असलेली बंद बॉडी या तत्सम स्वरुपातील व इंजिन क्षमता ३७०० सीसी च्या वरती असणे आवश्यक आहे.

४) सदर वाहन हे ७ वर्ष कालावधीपेक्षा जुने नसावे.

५) वाहन टी परमिट असणे बंधनकारक असून आरटीओ कडील सर्व परवाने व वाहनाचा पुर्ण विमा भरलेला असणे आवश्यक आहे.

६) नवीनतम व कमी चाललेल्या वाहनांना प्राधान्य देता येईल.

७) अटी शर्तीमध्ये बदल करणे अथवा शिथील करणेबाबतचे सर्व अधिकार जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, जळगांव यांनी राखुन ठेवण्यात आलेले आहे.

८) सदर वाहन शासनाचे पुढील आदेश पावेतो चालु ठेवण्यात येईल.

९) वाहन दुरुस्ती, चालक खर्च व टोल खर्च वाहन मालकास दयावा लागेल.

१०) वाहनाचा वापर ग्रामीण व डोंगराळ तसेच दुर्गम व अतिदुर्गम भागात करण्यात येईल.

११) किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती एका दिवसात व मोठया स्वरुपाची दुरुस्ती तीन दिवसात करुन देणे बंधनकारक राहील.

१२) सदरील वाहनांकरीता स्वतंत्र लॉगबुक असणे बंधनकारक आहे.

१३) वाहन खाजगी कामाकरीता किंवा दुरुस्तीकरीता फिरविल्यास होणारी धावसंख्या कामकाजाच्या धावसंख्येत समाविष्ट करता येणार नाही.

१४) वाहन धारकाने वाहन लावणेपुर्वी वाहनाची तांत्रिक तपासणी करण्यात येईल.

१५) वाहनधारकास वाहन रद्द करावयाचे असल्यास मा.जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, जळगांव यांना एक महिना पुर्वसुचना देणे बंधनकारक राहील.

१६) वाहनास कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास त्याची संपुर्ण जवाबदारी वाहन धारकाची अथवा वाहन चालकाची राहील. यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

१७) प्रत्येक महिन्यात वाहने फिरस्ती केल्याबाबतची नोंद लॉगबुक मध्ये घेऊन त्याची सत्यप्रत मा. जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे स्वाक्षरीने प्रमाणित करुन सादर करण्यात यावी. त्यानंतरच भाडे अदा करणेत येईल.

१८) वाहन धारकास कंत्राट मिळाल्यास देण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार १०० रु च्या स्टॅम्प पेपरवर नोटरीसह अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करारनामा दोन साक्षीदारांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात यावा.

१९) भाडयाच्या वाहन घेण्याच्या प्रस्तावित अटी मध्ये पुर्णतः अथवा अंशतः बदल करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगांव व मा.जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प.जळगांव यांना राखीव आहे.

२०) भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या वाहनांवर शासकीय संदेश व स्टिकर लावण्यात येतील.

**अर्जासोबत सादर करावयाचे कागदपत्र –**

१) अर्जदाराचा आरटीओ दराप्रमाणे वाहन पुरवठा करण्यास तयार असल्याचा व नोटीसमधील अटी व शर्ती मान्य असल्याचा विनंती अर्ज

२) आरसी बुकची छायांकित प्रत

३) प्रदुषण प्रमाणपत्र

४) विमा नुतनीकरण

५) प्रवासी वाहतुकीचा परवाना

६) फिटनेस प्रमाणपत्र

७) वाहनचालकाचे परवाना

वरीलप्रमाणे सर्व अटी व शर्तीनुसार तसेच उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या प्रती कि.मी. च्या मंजुर दरानुसार वाहनधारकास वाहन लावण्यास इच्छुक असल्यास वरीलप्रमाणे दिलेल्या कालावधीत जिल्हा आरोग्य अधिकारी आरोग्य विभाग, नवीन इमारत जिल्हा परिषद, जळगांव या कार्यालयास दिलेल्या तारखेच्या वेळेच्या आत अर्ज कागदपत्रांसह सादर करावेत.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, जळगांव
३०/१२/२४